आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

४ ऑक्टोबर २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- कॉर्पोरेट गव्हर्नन्स हा आधुनिक अर्थव्यवस्थेच्या पायाभूत सुविधांमधला अदृश्य, पण महत्त्वाचा भाग असल्याचं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन

- मुख्य निवडणूक आयुक्तांची हकालपट्टी करण्याची आणि आगामी निवडणुका मतपत्रिकेवर घेण्याची विरोधी पक्षांची मुंबईतल्या मोर्चात मागणी

- परदेशी गुंतवणूकदारांनी गेल्या महिन्यात भारतीय भांडवल बाजारातून सुमारे ३५ हजार ८६१ कोटी रुपये काढून घेतले

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धांचा समारोप /भारतीय गोल्फ युनियनकडून सुवर्णपदक विजेत्या प्रणवी उर्सला १० लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर

**<><><><>**

कॉर्पोरेट गव्हर्नन्स हा आजच्या आधुनिक अर्थव्यवस्थेच्या पायाभूत सुविधांमधला अदृश्य, पण महत्त्वाचा भाग आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीजच्या ५८व्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात ते नवी दिल्लीत बोलत होते. विकसित भारत साकारण्यासाठीच्या प्रत्यक्ष आणि डिजिटल पायाभूत सुविधा जितक्या महत्त्वाच्या आहेत, तितकंच बळकट संस्था आणि उत्तम शासनाचंही योगदान गरजेचं आहे, असंही ते म्हणाले. शाश्वत आर्थिक विकासासाठी गुंतवणूकदारांचा विश्वास महत्त्वपूर्ण असल्याचं मत त्यांनी मांडलं.

**<><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची हकालपट्टी करावी, या मागणीसाठी आज मुंबईत 'विराट गर्जना मोर्चा' काढण्यात आला. माजी मुख्यमंत्री

उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली निघालेला हा मोर्चा मेट्रो सिनेमापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयापर्यंत गेल्यानंतर त्याचं सभेत रुपांतर झालं. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात आणि विजय वडेट्टीवार, तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड आणि अनिल देशमुखही त्यात सहभागी झाले होते. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत, ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा किंवा त्यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी या नेत्यांनी केली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे सत्ताधारी भाजपाचं हत्यार असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला. जर मतदार यादीतून बांगलादेशी नागरिकांना वगळण्यासाठी ही SIR प्रक्रिया राबवली गेली असेल, तर देशात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या किती बांगलादेशी नागरिकांना सरकारनं शोधून काढलं, असा सवालही त्यांनी केला. तर, राज्यातल्या SIR, अर्थात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाची प्रक्रिया रद्द करण्याची मागणी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केली. देशातल्या आगामी निवडणुका बॅलेट पेपर, अर्थात मतदान पत्रिकांवर घेतल्या जाव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

निवडणूक आयोगाच्या सदस्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया बदलत निवड समितीमधून सरन्यायाधीशांना वगळलं, तिथूनच मतचोरीला सुरुवात झाली, असा दावा बाळासाहेब थोरात यांनी केला. आता आपल्याला ही परिस्थिती सुधारावी लागेल. लोकशाही वाचवण्यासाठी पुन्हा एकदा आपणा सर्वांना काम करावं लागेल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

कोट्यवधी नागरिकांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेणं हे मनमानीचं आणि घटनात्मक प्रक्रियचं घोर उल्लंघन करणारं आहे, असं परखड मत सर्वोच्च

न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी मांडलं आहे. ते आज हैदराबाद इथं नालसार विद्यापीठाच्या कार्यक्रमात बोलत होते.
मृत्यू झालेले मतदार वगळता, एकदा मतदार यादीत समाविष्ट झालेल्यांचं नाव नोटिस न देता आणि सुनावणी न घेता काढून टाकता येत नाही. असं करणं म्हणजे शरीरातून आत्मा काढून घेण्यासारखं आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. पुणे पदवीधर मतदारसंघातून स्मिता जाधव यांना, नागपूर पदवीधर मतदारसंघातून सुधाकर कोहळे यांना, तर पुणे शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ गावडे यांना भाजपाकडून उमेदवारी देण्यात आली आहे.

**<><><><><>**

परदेशी गुंतवणूकदारांनी सप्टेंबर महिन्यात भारतीय भांडवल बाजारातून सुमारे ३५ हजार ८६१ कोटी रुपये काढून घेतले. त्याआधीचे दोन महिने परदेशी संस्थांनी मोठी गुंतवणूक भारतीय बाजारात केली होती. जागतिक स्तरावर भूराजकीय संघर्षाची स्थिती, अमेरिकेत व्याजदरात वाढ, आणि क्रूड तेलाच्या किमतीतली वाढ यामुळे परदेशी गुंतवणूकदारांनी समभागांची विक्री केली, कर्जरोखे स्वरूपातली गुंतवणूकही मोठ्या प्रमाणात घटली. मात्र सुरुवातीच्या इश्यूंमधे ९ हजार ६७६ कोटी रुपयांची गुंतवणूक परदेशातून आली आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडातल्या राज्यसभेच्या आगामी द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भाजपने दिनेश आर्य यांना उमेदवारी दिली आहे. पश्चिम बंगालमध्ये राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी रुक्मिणी मलिक यांच्या नावाची घोषणाही आज भाजपने केली. या नावांना भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने मंजुरी दिली आहे.

निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया या महिन्याच्या २९ तारखेला सुरू होईल आणि १६ ऑक्टोबर रोजी मतदान होईल.

<><><><>

जपानमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विसाव्या आशियाई क्रीडा स्पर्धांचा आज समारोप झाला. दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ चाललेल्या या रोमांचक स्पर्धांमधे भारतानं दमदार कामगिरी केली असून, २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदकांसह एकूण ८५ पदकांची कमाई केली, आणि पदकतालिकेत चौथं स्थान पटकावलं.

जपानमध्ये नागोया इथल्या पालोमा मिझुहो स्टेडियमवर क्रीडा स्पर्धांचा समारोप सोहळा संपन्न झाला. खेळाडूंच्या संचलन फेरीत, नेमबाज नीरू धांडा’नं तिरंगा ध्वज फडकावत भारताची ध्वजवाहक म्हणून भूमिका बजावली. या कार्यक्रमात 'दोहा २०३०' क्रीडा स्पर्धांच्या आयोजन समितीकडे अधिकृतपणे जबाबदारी सोपवण्यात आली.

दरम्यान, भारतीय गोल्फ युनियननं आज आशियाई क्रीडा स्पर्धेतल्या देशाची पहिली महिला वैयक्तिक सुवर्णपदक विजेती प्रणवी उर्स हिला १० लाख रुपयांचा रोख पुरस्कार जाहीर केला.

<><><><>

स्वित्झर्लंडचे राष्ट्राध्यक्ष गाय पार्मेलिन भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी उद्या नवी दिल्लीत दाखल होत आहेत. त्यांच्यासोबत वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग क्षेत्रातल्या नेत्यांचा समावेश असलेलं उच्चस्तरीय शिष्टमंडळ असेल. उद्या संध्याकाळी ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील. त्यानंतर, विविध क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि पार्मेलिन यांच्यात द्विपक्षीय चर्चा होईल. यामध्ये व्यापार आणि गुंतवणूक, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम, गतिशीलता, संस्कृती यांसारख्या क्षेत्रांचा समावेश आहे. परराष्ट्र

मंत्री डॉ. एस. जयशंकर यांचीही पार्मेलिन यांच्याशी भेट होईल. पार्मेलिन यांचा हा भारताचा पहिला दौरा आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आंदोलन करणाऱ्या एमपीएससीच्या विद्यार्थ्यांशी सरकारनं तत्काळ संवाद साधावा, अशी विनंती ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली आहे. पुण्यात ते वार्ताहरांशी बोलत होते. सरकार आणि विद्यार्थी संघटनांमध्ये अर्थपूर्ण संवाद झाला, तरच हा प्रश्न मार्गी लागेल, असं मत त्यांनी मांडलं.

एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक असून विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करावं, असं आवाहन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात वार्ताहर परिषदेत केलं.

**<><><><><>**

यंदाच्या सप्टेंबर महिन्यातलं तेल उत्पादनाचं प्रमाण नोव्हेंबर महिन्यात कायम राखण्याचा निर्णय ७ ओपेक प्लस देशांनी घेतला आहे. आज दूरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या या देशांच्या बैठकीत जागतिक तेल बाजारपेठेतल्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षा, पुरवठा साखळीची लवचिकता आणि कनेक्टिव्हिटी, ही उदयोन्मुख शक्तींसाठी महत्वाची उद्दिष्ट असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत ६२ व्या म्युनिक सुरक्षा परिषदेला संबोधित करत होते. 'ग्लोबल साउथ' आणि 'ग्लोबल नॉर्थ' मधल्या उदयोन्मुख आणि मध्यम शक्ती अधिक महत्वाच्या भूमिका बजावण्याचं उद्दिष्ट गाठण्यासाठी  एकत्र आल्याचं ते यावेळी म्हणाले.

अमेरिकेचं बदलतं जागतिक स्थान, चीनचा उदय आणि वाढतं परस्पर अवलंबित्व, यामुळे उदयोन्मुख शक्ती एकत्र येत असून जोखीम कमी करणं, आणि उद्दिष्ट -आधारित सहकार्य साधणं, हा त्यांचा दृष्टिकोन असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

अमेरिकेबरोबरचा संघर्ष संपवण्यासाठी मुत्सद्देगिरी, हाच एकमेव उपाय असल्याचं इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी म्हटलं आहे. ते आज तेहरानमध्ये विविध देशांचे राजदूत, आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. मात्र अमेरिकेनं लष्करी मार्गाचा अवलंब केला, तर त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी इराण पूर्वीपेक्षा जास्त सज्ज असेल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

दरम्यान, इराण बरोबरचा आपला संघर्ष लवकरच संपेल आणि त्यानंतर तेलाच्या दरात मोठी घसरण होईल, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

<><><><>

रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पांवरचे हल्ले वाढवू, अशी भूमिका युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी घेतल्यानंतर युक्रेनची राजधानी कीव्ह आणि इतर भागांवरचे हल्ले आणखी तीव्र करायचा इशारा रशियानं दिला आहे. युक्रेनच्या विविध भागांत लष्करी आस्थापना, संरक्षण उद्योग आणि इतर पायाभूत सुविधांवर हल्ले करू, असं रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं आज सांगितलं.

<><><><>

आज संपूर्ण जग संघर्ष, युद्ध, असहिष्णुता आणि सामाजिक विभाजनाला सामोरं जात असताना भगवान महावीरांचा क्षमापना आणि विश्व मैत्रीचा संदेश अधिक प्रासंगिक झाला आहे, असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज

केलं. भारत जैन महामंडळातर्फे घाटकोपर पूर्व इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होतं.

<><><><><>

एव्हरेस्ट कंपनीची पाकिटबंद जिरेपूड सेवनासाठी अयोग्य असल्याचं तपासणीत आढळून आल्यानं ती बाजारपेठेतून परत मागवायचे निर्देश FSSAIनं दिले आहेत. या जिरेपुडीत ॲझोक्सिस्ट्रोबिन आणि थायमेथॉक्सॅम हे दोन घटक मर्यादिपेक्षा जास्त प्रमाणात आढळल्यानं ही कारवाई करण्यात आली आहे.

//<><><><><>//